Vivekanand Shikshan Sanstha’s

**Vivekanand Arts, Sardar Dalipsingh Commerce & Science College**

Samarthnagar, Aurangabad.

Date :

# PRESS RELEASE

## विवेकानंद महाविद्यालयाचे आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धेमध्ये यश

विवेकानंद महाविद्यालयातर्फे टर्फ वरती आयोजित केल्या गेलेल्या ऐतिहासिक आंतर महाविद्यालयीन हॉकी (पुरुष व महिला) स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या पुरुष व महिला या दोनीही संघाने आपल्या लौकिकतेस साजेशी सर्वोत्कृष्ट कामगिरी करत महिला संघाने सुवर्ण पदकासह विजेतेपद पटकावले तर पुरुष संघाने रौप्य पदक प्राप्त करत उपविजेतेपद मिळवले.

मुलींच्या झालेल्या अंतिम सामन्यांमध्ये विवेकानंद महाविद्यालयाने इंदिराबाई पाठक महिला महाविद्यालयाचा 3 - 0 अशा गुणांनी दणदणीत पराभव करून विजेतेपदपटकावले. या सामन्यांमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची कर्णधार कुमारी श्रुती विधाते हिने उत्कृष्ट असा पहिला गोल विवेकानंदतर्फे केला तर उर्वरित दोन गोल पूनम वाणी हिने केले. यांनागोलकीपर प्राची औटे, निशा चव्हाण, मेनका, प्रसाद, काजल डुकरे, उमा शेळके व श्रद्धा साळुंखे यांनी मोलाची साथ दिली. तसेच पुरुष गटामध्ये झालेल्या विवेकानंद महाविद्यालय विरुद्धदेवगिरी अत्यंत अटीतटीच्या सामन्यांमध्ये या दोन्ही संघाने 1-1 गोल केल्यामुळे सामना बरोबरीत राहिला तसेच सामन्याचा निकाल टायब्रेकरमध्ये लागला. यामध्ये विवेकानंदमहाविद्यालय उपविजेता ठरला. या सामन्यांमध्ये विवेकानंद महाविद्यालयाचा अनुजकुमार याने २ गोल केले. त्याला कर्णधार रोहन जोगदंडे, गणेश ढवळे, वैभव मोकाशे, आकाश नीळ वगोलकीपर सुमित गायकवाड यांनी मोलाची साथ दिली.

दोन्ही संघाच्या यशाबद्दल या सर्व खेळाडूंचे विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अक्षय भाऊ शिसोदे, सचिव श्री श्रीमंतरावशिसोदे, उपाध्यक्ष श्री अमर भाऊ शिसोदे, सहसचिव श्री यशोद

पाटील, कोषाध्यक्ष श्री तुषार भाऊ शिसोदे, प्रशासकीय अधिकारी श्री प्रभाकर मोरे, प्राचार्य प्रोफेसर श्याम शिरसाट,उपप्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे व डॉ. राजेंद्र शेजुळ आणि शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख डॉ. गोविंद कदम आदींनी अभिनंदन केले.

